आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२७ मार्च २०२५ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- तूर, मसूर आणि उडदाचं संपूर्ण उत्पादन किमान हमीभावानं खरेदी करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय
- देशातल्या प्रसारमाध्यम आणि मनोरंजन क्षेत्रात चालू आर्थिक वर्षात सुमारे अडीच हजार अब्ज रुपयांची उलाढाल
- उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये प्रवाशांच्या सेवेसाठी एसटी महामंडळ जादा गाड्या सोडणार
- महाड औद्योगिक वसाहतीत अंमली पदार्थांचं उत्पादन करणाऱ्या कारखान्यातून ४७ किलो अंमली पदार्थ जप्त

**आणि**

- खेलो इंडिया पॅरा गेम्स स्पर्धेचा आज समारोप होणार

**<><><><><>**

तूर, मसूर आणि उडदाचं जेवढं उत्पादन होईल ते सर्व किमान हमीभावाने खरेदी करण्याचा निर्णय केंद्रसरकारने घेतला आहे. केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याणमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज नवी दिल्लीत कृषी भवन इथं पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. शेतमालाला योग्य भाव मिळवून देण्यासाठी केंद्रसरकार वचनबद्ध असल्याचं ते म्हणाले. याकरता शेतकऱ्यांना नाफेड आणि राष्ट्रीय सहकारी ग्राहक महासंघाच्या पोर्टलवर नोंदणी करावी लागेल. शेतकऱ्यांना तूर, मसूर आणि उडदाचा योग्य भाव मिळावा याकरता राज्यसरकारांनी प्रभावी आणि पारदर्शी खरेदी पद्धत राबवावी असं आवाहन त्यांनी केलं.

येत्या ४ वर्षात या अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्णता साध्य करण्याचं उद्दिष्ट अर्थसंकल्पात निश्चित करण्यात आलं आहे. केंद्रसरकारने चालू रबी हंगामात ३७ लाख ३९ हजार टन कडधान्यांच्या तर २८ लाख २८ हजार टन राईच्या खरेदीला मान्यता दिली आहे, अशी माहिती त्यांनी दिली. खरीपातली तूर खरेदी २ लाख ४६ हजार टन पर्यंत झाली असून त्याचा फायदा १ लाख ७१ हजार शेतकऱ्यांना मिळाला आहे. महाराष्ट्र, गुजरात,आंध्र प्रदेश, तेलंगण आणि कर्नाटकमधे हमीभावाने खरेदी सुरु असून कर्नाटकात खरेदीची मुदत १ मे पर्यंत वाढवण्यात आली आहे.

**<><><><><>**

देशातल्या प्रसारमाध्यम आणि मनोरंजन क्षेत्राने २०२४मधे सुमारे अडीच हजार अब्ज रुपयांची उलाढाल केली , तर जाहिरातीतून मिळणारा महसूल ८ पूर्णांक १ दशांश टक्क्यांनी वाढला आहे. फिक्की आणि अर्न्स्ट अँड यंग या संस्थांनी सर्वोक्षण करुन प्रसिद्ध केलेल्या अहवालात ही माहिती दिली आहे. जाहीर कार्यक्रमांच्या थेट प्रसारणात १५ ट्क्के वाढ झाली तर दूरचित्रवाहिनी, चित्रपट, छापीलमाध्यमं आणि ऑनलाईन गेमिंगचे ग्राहक २ ट्क्क्यांनी कमी झाले असं या अहवालात म्हटलं आहे. चालू वर्षात या क्षेत्रात ७ पूर्णांक २ दशांश टक्के वाढ होईल असा अंदाज व्यक्त केला आहे.

मुंबईत आज एका कार्यक्रमात हा अहवाल प्रसिद्ध करण्यात आला. प्रसारभारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी यावेळी उपस्थित होते. देशात प्रसारमाध्यमांमधे सर्जनशील मजकुरात गेल्या काही दिवसात सातत्याने वाढ होत असून ग्रामीण आणि दुर्गम भागतले प्रतिभावंत कलाकार जगासमोर व्यक्त होत आहेत असं ते यावेळी म्हणाले. माहिती आणि प्रसारण

मंत्रालयातर्फे आयोजित करण्यात आलेल्या वेव्ज उपक्रमाबाबत त्यांनी माहिती दिली.

**<><><><><>**

चहा निर्यात करणाऱ्या देशांच्या यादीत भारताने दुसरं स्थान मिळवलं आहे. भारतीय चहा बोर्डाने प्रसिद्ध केलेली आकडेवारी सांगते की, गेल्या वर्षभरात भारताने २५ कोटी ५० लाख टन चहाची निर्यात केली, जो गेल्या १० वर्षातला उच्चांक आहे. या निर्यात वाढीमुळे भारताने श्रीलंकेला मागं टाकलं असून एकूण निर्यातीत १० टक्के वाटा भारताचा आहे. पहिल्या स्थानावर केनिया आहे. जगातल्या २५ देशांमधे भारतातून चहा निर्यात केला जातो. त्यात अंयुक्त अरब अमिराती, इराक, इराण, रशिया, अमेरिका आणि युके हे महत्त्वाचे खरेदीदार आहेत.

भारतातला आसाम, दार्जिलिंग आणि नीलगिरीत पिकणारा चहा जगातल्या सर्वोच्च दर्जात गणला जातो. चहाउत्पादन वाढीसाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या असून या क्षेत्रात सुमारे साडे अकरा ११ लाख जणांना थेट रोजगार मिळतो. तर संबंधित क्षेत्रात तेवढेच रोजगार उपलब्ध आहेत.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याविरुद्धचा हक्कभंग प्रस्ताव राज्यसभा अध्यक्ष जगदीप धनखड यांनी आज फेटाळून लावला. काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी यांच्याविरुद्ध अपमानजनक टिप्पणी केल्याप्रकरणी काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी या प्रस्तावाची नोटीस दिली होती. २५ मार्च रोजी राज्यसभेत आपत्ती व्यवस्थापन विधेयकावर बोलताना शहा यांनी ही टिप्पणी केली होती. या विधानात

आपल्याला मर्यादांचं उल्लंघन आढळलं नाही असं धनखड यांनी सांगितलं. अध्यक्ष जगदीप धनखड यांनी सदस्यांच्या वर्तनासाठी नवे मार्गदर्शन तत्वं जारी करायला आचारसंहिता विषयक समितीला सांगितलं आहे.

<><><><>

विवाहपूर्व समुपदेशनासाठी देशातल्या ११ राज्यांमध्ये आतापर्यंत २३ केंद्र उभारण्यात आल्याची माहिती, राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी दिली. अशी समुपदेशन केंद्र सरकारी कार्यालयांमध्ये उघडण्यात येतील, त्यांचावर जिल्हा प्रशासन किंवा पालिकांची देखरेख राहील. विवाहासंबंधी सामाजिक मानसशास्त्र आणि वर्तनाचे पैलू यांच्याविषयी विवाहेच्छुक मुलामुलींना समुपदेशन या केंद्रात देण्यात येईल. संयुक्त कुटुंब पद्धती लयाला जात लहान कुटुंब निर्माण होत आहेत, त्यामुळे वैवाहिक तंटे, घटस्फोट, अपयशी विवाहांची प्रकरणं वाढत असल्याचंही रहाटकर यांनी सांगितलं.

<><><><>

विदर्भात, विशेषतः अमरावती जिल्ह्यात, स्थानिक बाजारात मागणी वाढल्यानं सरकीच्या दरात क्विंटलमागे २०० ते ३०० रुपयांची वाढ झाली आहे. त्यामुळे कापसाचे दरही सव्वा ते साडे सात हजार रुपयांवर पोहोचले आहेत. सरकीचे दर पूर्वी ३ हाजर ३०० रुपये क्विंटल होते ते गेल्या दोन दिवसात ३ हजार ७५० रुपये क्विंटलपर्यंत पोहोचले आहेत. रुईच्या दरात मात्र वाढ झालेली नाही.

रुपयाच्या तुलनेत डॉलरची दरवाढ, चीनच्या तयार कपड्यांवर अमेरिकेनं वाढविलेला कर, यासह अन्य बाबींमुळे देशांतर्गत कापसाचे दर टिकून असल्याचं व्यापारी सूत्रांनी सांगितलं.

<><><><><>

उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन राज्य मार्ग परिवहन महामंडळातर्फे दरवर्षीप्रमाणे जादा गाड्या सोडण्यात येणार आहेत. दररोज लांब पल्ल्याच्या ७६४ फेऱ्यांचं नियोजन करण्यात आलं आहे. १५ एप्रिल ते १५ जून या कालावधीत ही सुविधा उपलब्ध असून महामंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर आरक्षण करता येईल.

<><><><><>

एल्गार परिषद हिंसाचार प्रकरणात अटकेत असलेले वकील सुरेंद्र गडलिंग आणि सामाजिक कार्यकर्त्या ज्योती जगताप यांच्या जामीन अर्जावरील सुनावणी सर्वोच्च न्यायालयाने दोन आठवडे पुढे ढकलली आहे. महेश राऊत यांच्या जामीन अर्जाला आव्हान देणाऱ्या राष्ट्रीय तपास संस्थेच्या याचिकेवरील सुनावणीही न्यायालयाने पुढे ढकलली आहे. महेश राऊत यांना मुंबई उच्च न्यायालयाने जामीन दिला होता, मात्र एनआयएने याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिल्यानंतर या निर्णयाला स्थिगीती देण्यात आली आहे.

<><><><><>

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी महायुती सरकारच्या अर्थसंकल्पावर टीका केली आहे. हा अर्थसंकल्प पाशवी बहुमत मिळवलेल्या अस्वस्थ सरकारने मांडलेला निरर्थक अर्थसंकल्प असल्याचं ते आज झालेल्या

पत्रकार परिषदेत म्हणाले. सरकार स्थापनेवेळी १०० दिवसांचा आराखडा मांडण्यात आला होता. त्या आराखड्यापैकी एकही गोष्ट या अर्थसंकल्पात आली नसल्याची टीका ठाकरे यांनी केली.

<><><><><>

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सांगलीचे जिल्हाप्रमुख संजय विभुते आणि सोलापूरचे माजी संपर्कप्रमुख संजय कोकाटे यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. यात मुंबई, अहिल्यानगर, सोलापूर, सांगली, लातूर, पुणे जिल्ह्यातल्या पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मुंबईतल्या मुक्तागिरी या निवासस्थानी हा प्रवेश झाला.

<><><><><>

रायगड जिल्ह्यातल्या महाड औद्योगिक वसाहतीत अंमली पदार्थांचं उत्पादन करणारा एक कारखाना राष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी पथकानं उघडकीस आणला असून या कारखान्यातून ४७ किलो अंमली पदार्थ जप्त केले आहेत. त्याची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतली अदाजे किंमत ५० कोटी रुपये आहे. या प्रकरणी दोघांना मुंबईच्या भांडूप भागातून २२ मार्च रोजी ताब्यात घेतल्याची माहिती पथकानं दिली. हे दोघे सध्या जामिनावर बाहेर असल्याचंही पथकानं सांगितलं आहे.

<><><><><>

नवी दिल्लीत सुरु असलेल्या खेलो इंडिया पॅरा क्रीडा स्पर्धेचा आज समारोप होत आहे. केंद्रीय क्रीडा आणि युवक कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे या समारोप सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत. या स्पर्धेत महाराष्ट्राने १५

सुवर्णांसह एकूण ३७ पदकांची कमाई करत पाचवं स्थान पटकावलं आहे. यामध्ये १३ रौप्य आणि नऊ कांस्य पदकांचा समावेश आहे. हरियाणा पहिल्या, तामिळनाडू दुसऱ्या, उत्तर प्रदेश तिसऱ्या तर राजस्थान चौथ्या स्थानावर आहे. दरम्यान, या स्पर्धेत काल भारोत्तोलन प्रकारात महाराष्ट्राच्या खेळाडूंनी दोन सुवर्ण, दोन रौप्य आणि एका कांस्य पदकाची कमाई केली. नेमबाजीत स्वरूप उन्हाळकर आणि सागर कातळेनं सुवर्णपदकं जिंकली.

**<><><><><>**

आयपीएल टीट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज सनरायझर्स हैदराबाद संघाचा सामना लखनऊ सुपर जायंट्स संघाबरोबर होणार आहे. हैदराबाद इथे राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियममध्ये आज संध्याकाळी साडेसात वाजता या सामन्याला सुरुवात होईल.

**<><><><><>**

एमव्ही बिटू रिव्हर या खासगी व्यापारी नौकेवरच्या १० खलाशांना समुद्री चाच्यांनी ओलीस ठेवलं आहेत. त्यात ७ भारतीय आहेत आणि यापैकी दोघे रत्नागिरी जिल्ह्यातले आहेत. मध्य आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्याजवळच्या साओ तोमे आणि प्रिन्सिपे या बेटांजवळ समुद्री चाच्यांनी या नौकेवर हल्ला केला. ओलीस ठेवलेल्यांमध्ये समीन जावेद मिरकर आणि रिहान शब्बीर सोलकर या रत्नागिरीतल्या दोघा तरुणांचा समावेश आहे, अशी माहिती त्यांच्या वडिलांनी दिली. त्यांच्या सुटकेसाठी तातडीनं उपाययोजना करण्याची मागणी त्यांनी प्रशासनाकडे केली आहे.

**//<><><><><>//**